**महाराष्ट्र नगरपरिषद सेवा अंतर्गत संवर्गाबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील विविध अधिकारांचे विकेंद्रीकरण.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

परिपत्रक क्र. नपप्रसं २०१८/प्र.क्र.        /२०१८/कक्ष-३/ ४०६७

शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ मजला,

सर पोचखानवाला रोड, वरळी,

मुंबई - ४०० ०३०

**दिनांक :** ----.१०.२०१८ 17 OCT 2018

**परिपत्रक**

**वाचा:-** शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. क्रमांक एमसीओ-२०१७/ प्र.क्र.१७३/ नवि-१४, दि.३० जानेवारी, २०१८

महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६ मधील तरतूदीनुसार राज्यातील नगरपरिषदातील विविध पदासाठी सेवांचे गठन करण्यात आलेले आहे. शासन अधिसूचना दि. ३० जानेवारी,२०१८ पुर्वी या सेवातील संवर्ग श्रेणी क-१ व श्रेणी क-२ यासाठी जिल्हाधिकारी, श्रेणी-ब साठी संबंधित विभागीय आयुक्त व श्रेणी-अ साठी आयुक्त तथा संचालक हे नियुक्ती प्राधिकारी होते. उपरोक्त वाचा मधील अधिसूचनेनुसार या सर्व श्रेणी संवर्गासाठी आयुक्त तथा संचालक हे नियुक्ती प्राधिकारी असतील अशी तरतूद करण्यात आलेली आहे. यामुळे राज्यातील सर्व सेवांतील संवर्ग कर्मचाऱ्यांच्या सेवांसंबंधी महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील प्रकरणे मान्यतेसाठी संचालनालयाकडे सादर करण्यात येतात. कामकाजाचे नियोजन व त्यात स्थानिक, जिल्हा व विभाग पातळीवर निर्णय होऊन कामकाजात गतिमानता आणण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेले विविध अधिकार कनिष्ठ स्तरावर प्राधिकृत करणे आवश्यक झालेले आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील जे अधिकार कार्यालय प्रमुख यांना प्रदान केलेले आहेत. त्यांचा वापर कोणी करावा याबाबत स्पष्टता आणणे आवश्यक आहे. याबाबी विचारात घेता महाराष्ट्र नगरपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी संबंधी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरे राज्य सेवा (समावेशन, नियुक्त्या व सेवेच्या शर्ती) नियम २००६ (सुधारणासह) मधील तरतूदीनुसार नियुक्ती प्राधिकारी म्हणून आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, महाराष्ट्र नगरपरिषद सेवा अंतर्गत गठीत विविध श्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांचे सेवा विषयक बाबीं संबंधी महाराष्ट्र नागरी सेवा नियम तसेच इतर तरतूदीनुसारचे अधिकार, हे सोबतच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे प्राधिकारी यांना प्रदान करीत आहे.

या आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकार व शक्ती यांचा वापर संबंधित प्राधिकारी यांनी जनहित विचारात घेवून या सेवा अंतर्गतचे कामकाजात गतिमानता आणण्यासाठी करावा.

हे आदेश आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

(मुथ्थुकृष्णन संकरनारायणन्)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

प्रत:-

१. प्रादेशिक उप संचालक, नगरपालिका प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व विभाग.
२. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व जिल्हा.
३. मुख्याधिकारी , नगरपरिषद / नगरपंचायती सर्व .

## नगर परिषद प्रशासन संचालनालय

### आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन

| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | सर्व सेवा व श्रेणी अंतर्गत कार्यरत कर्मचारी याच्या संदर्भात रजा मंजुरी संबधी प्राधिकार | | |
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद सेवा अंतर्गत सर्व श्रेणी संवर्गातील कर्मचारी यांना विशेष विकलांगता रजा आणि अध्ययन रजा ,अध्ययन रजा व्यतिरिक्त विषेश प्रकारच्या रजा या व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या रजा मंजूर करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम २७ | १) ६० दिवसा पर्यंत : संबंधित नगर परिषद/नगर पंचायत मुख्याधिकारी.<br>२) ६० दिवसा पेक्षा अधिक परंतु १२०- दिवसापेक्षा कमी : संबंधित जिल्ह्याचे जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर परिषद प्रशासन<br>३) १२०- दिवसापेक्षा अधिक : संबंधित प्रादेशिक उप संचालक . नगरपरिषद प्रशासन |
| २ | रजा संपल्या नंतर अनुपस्थित राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याची वाढीव रजा मंजूर करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ४८ | वरील अनु क्रमांक १ मध्ये नमूद केल्या प्रमाणे रजा मंजुरीसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी त्यांना विहित केलेल्या कालावधीच्या मर्यादेत |
| ३ | रजेशिवाय अनुपस्थित राहिल्याचा कालावधी भूतलक्षी प्रभावाने असाधारण रजेमध्ये परावर्तीत करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ६३ (६) | वरील अनु क्रमांक १ मध्ये नमूद केल्या प्रमाणे रजा मंजुरीसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी त्यांना विहित केलेल्या कालावधीच्या मर्यादेत |
| ४ | परिवीक्षाधीन कर्मचा-याची रजा मंजूर करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ६४ | वरील अनुक्रमांक १ मध्ये केलेल्या मर्यादानुसार संबंधीत नमूद प्राधिकारी |

आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन

| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
|---|---|---|---|
| ५ | अ) पुढील सेवा करण्यास संपूर्णपणे व कायमचा असमर्थ म्हणून घोषित केलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला रजा मंजूर करणे.<br>ब) कामावर पुन्हा रूजु होण्यासाठी पात्र ठरण्याची शक्यता नसलेल्या शासकीय कर्मच्याऱ्यास द्यावयाची रजा. | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ४३ | १) प्रादेशिक उप संचालक , नगररिषद प्रशासन , संबधित विभाग |
| ६ | असाधारण रजा मंजूर करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ६३ (१) व (२) | १) १) नियम ६३ (२) (अ) नुसार तीन महिन्यांच्या कालावधी पर्यंत : जिल्हा प्रशासन अधिकारी |
| | | | २) २) नियम ६३ (२) (ब), (क) व (ड) नुसार : प्रादेशिक उप संचालक, नगररिषद प्रशासन, संबधित विभाग |
| | | | ३) ३) नियम ६३ (२) (इ) व (फ) नुसार अनुक्रमे १८ महीने ते २ वर्षाच्या कालावधी पर्यन्त : प्रादेशिक उप संचालक, नगररिषद प्रशासन |
| ७ | अध्ययन रजा मंजूर करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ८० | अ. अग्निशमन सेवेत कार्यरत कर्मचारी यांना त्यांचे विषयातील वरिष्ठ पाठ्यक्रम पूर्ण करणेसाठी : संबधीत प्रादेशिक उपसंचालक , नगरपरिषद प्रशासन |
| | | | ब. वरील व्यतिरिक्त इतर सर्व प्रकरणे आयुक्त तथा संचालक , नगरपरिषद प्रशासन. |
| ८ | अध्ययन रजा व्यतिरिक्त विषेश प्रकारच्या रजा : महिला कर्मचाऱ्याच्या बाबतीत प्रसूती रजा मंजूर करणे/ बालसंगोपण रजा | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ७४ .<br>सामान्य प्रशासन विभागाकडील दि.२३.०७.२०१८ चे आदेश | १) १८०दिवसा पर्यंतचा कालावधी : जिल्हा प्रशासन अधिकारी |
| | | | २) १८०दिवसा पेक्षा जास्त अधिक कालावधी : संबंधित प्रादेशिक उप संचालक , नगर परिषद प्रशासन |

| आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
| ९ | अध्ययन रजा व्यतिरिक्त विषेश प्रकारच्या रजा : विषेश विकलांगता रजा / अपघाती इजेबाबत रजा मंजूर करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ७५ / ७६ | वरील अनुक्रमांक १ मध्ये केलेल्या मर्यादानुसार संबंधीत नमूद प्राधिकारी |
| १० | अध्ययन रजा व्यतिरिक्त विषेश प्रकारच्या रजा : सवलत रजा ( पक्षघात , कर्करोग , कुष्ठरोग , क्षयरोग ) मंजूर करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ७९ | प्रादेशिक उप संचालक , नगररिषद प्रशासन , संबधित विभाग |
| | टिप :- | | |
| | १. कोणत्याही प्रकाराच्या किंवा कालावधीसाठी संबधित कर्मचारी यांनी आपल्या रजेचे आवेदन हे मुख्याधिकारी यांचे कडेस सादर करणे आवश्यक आहे. | | |
| | २ मुख्याधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकार मर्यादेपेक्षा अधिकच्या कालावधीसाठी रजा मंजुरी साठी मुख्याधिकारी यांनी शिल्लक रजेचा तपशील तसेच आपले सुस्पष्ट अभिप्राय यासह प्रस्ताव जिल्हा प्रशासन अधिकारी यांचे कडे प्रस्ताव सादर करावयाचा आहे.तसेच उपसंचालक यांच्या अधिकार मर्यादेतील रजा मंजुरी प्रमाणे जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्यामार्फत त्यांच्या स्पष्ट अभिप्रायसाह पाठविण्यात यावेत. | | |
| | ३. आयुक्त तथा संचालक , नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडेस प्रस्ताव सादर करतांना तो जिल्हा प्रशासन अधिकारी व प्रादेशिक उपसंचालक यांचे मार्फतच सादर करावा , त्यांनी प्राप्त प्रस्ताव तपासून त्यांचे अभिप्राय नमूद करून शिफारासीसह प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा. | | |
| | ४. वरिष्ठ प्राधीकारी यांचेकडेस रजा मान्यतेचा प्रस्ताव सादर करतांना शिल्लक रजेची गणना करून त्यासंबधी प्रमाणपत्र प्रस्तावा सोबत सादर केले पाहिजे. | | |
| | ५. सक्षम प्राधिकारी यांनी रजा मंजुरीचे आदेश पारित केल्या नंतर शक्य तितक्या लवकर त्यासंबधी नोंदी सेवा पुस्तकात करून रजेचा हिशोब अद्यावायात करण्यात यावा | | |
| | ६. बदली झालेल्या कर्मचा-याबाबत त्यांचे सेवा पुस्तक बदली झालेल्या नगरपरिषद / नगरपंचायत कडेस हस्तांतरीत करतांना रजेच्या सर्व नोंदी अद्यावायात करून शिल्लक रजेचा हिशोब पूर्ण करून तो स्वाक्षरीत करावा | | |
| | ७. नगरपरिषद / नगरपंचायत स्तरावर प्रत्येक कर्मचारी यांचे सेवापुस्तकातील रजेसंबधी नोंदी अद्यावायात ठेवणेची जबाबदारी प्रशासन अधिकारी किंवा आस्थापना विषयक बाबी हाताळणारा विभाग प्रमुख यांची असेल. | | |
| | वेतन व वेतन निश्चीतीसंबधीत अधिकार | | |
| ११ | अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्याचा अधिकार | महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ नियम ५६ | मुख्याधिकारी , संबधीत नगरपरिषद / नगरपंचायत |

| आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद . | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
| १२ | क्रमप्राप्त म्हणून नियमित वेतन वाढ मंजूर करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ नियम ३६ | मुख्याधिकारी संबंधित नगरपरिषद /नगर पंचायत |
| १३ | शासकीय सेवेत पहिल्या नियुक्तीचे वेतन निश्चित करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ नियम १० | पद स्थापना देण्यात आलेल्या संबंधित नगरपरिषद /नगर पंचायत , मुख्याधिकारी |
| १४ | दुस-या पदावर नियुक्ती झाल्यानंतर वेतननिश्चिती करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ नियम ११ | मुख्याधिकारी संबंधित नगरपरिषद /नगर पंचायत |
| १५ | नियम ११ व्यतिरिक्त इतर प्रकरणात वेतन निश्चिती | महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ नियम १२, १४ ते १६ | जिल्हा प्रशासन अधिकारी , संबधित जिल्हा |
| १६ | सक्तीच्या प्रतीक्षेचा कालावधी 'कर्तव्य' म्हणून नियमीत करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ नियम ९(१४) (फ) | बदली करण्याचे संबधीत प्राधीकारी. |
| १७ | नक्षलग्रस्त / आदिवासी /दुर्गम भागात कार्यरत कर्मचारी यांना शासन निर्णयाप्रमाणे एकस्तर वरिष्ठ टप्प्यावरील वेतनश्रेणी देणे | सामान प्रशासन विभागाकडील दि.०६ ऑगस्ट, २००२ या आदेशातील मुद्या क्र. ३(७) | विभागीय उपसंचालक नगरपालीका प्रशासन |
| १८ | वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीच्या गान्यतेबाबत | सार्वजनिक आरोग्य विभागाचा दि. २४.०८.२०१५ चा शासन निर्णय. | अ) रु.३,००,००० पर्यंत संबंधीत जिल्ह्याचे जिल्हा प्रशासन अधिकारी,<br>ब) रु.३,००,००० पेक्षा जास्त संबंधीत विभागाचे प्रादेशीक उपसंचालक, |
| | सर्व सेवा व श्रेणी अंतर्गत कार्यरत कर्मचारी याच्या संदर्भात सेवानिवृती लाभ देणे संबधी बाबी | | |
| १९ | पुढील सहा महिन्यात नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होणा-या कर्मचारी यांना सेवा निवृतीबाबत पूर्वसूचना देणे / व नियम १२१ नुसार निवृती वेतन विषयक कागद पत्र पूर्ण करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम,१९८२ चे नियम क्र.११८ ते १२१ | संबधीत मुख्याधिकारी |

| आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
| २० | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या किंवा ज्यांना सक्षम प्राधिकारी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्त / रुग्णता सेवा निवृतीस होण्यास परवानगी दिलेली आहे किंवा सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचारी यांच्या सेवेची व सेवापुस्तकाची पडताळणी साठी वेतन पडताळणी पथकाकडेस सादर करून पडताळणी करून घेणे | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम,१९८२ चे नियम क्र.१२१ (१) (अ) | १.) संबधीत नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी वेतन पडताळणीसाठी सेवा पूस्तक संबधित विभागाचे वेतन पडताळणी पथक / स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय यांचेकडे पाठविणे. |
| २१ | १. पुढील सहा महिन्यात नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होणा-या किंवा ज्याना सक्षम प्राधिकारी यांनी स्वेच्छा सेवा निवृत्ती / रुग्णता सेवा निवृत्तीस मान्यता प्रदान केलेली आहे , अशा कर्मचारी यांना सेवा निवृतीविषयक लाभ प्रदान करणेसाठी ते यापूर्वी कार्यरत असलेल्या कार्यालयाकडून नादेय प्रमाणपत्र तसेच ना चौकशी प्रमाणपत्र मागविणे.<br>२. प्राप्त नादेय प्रमाणपत्र तसेच ना चौकशी प्रमाणपत्र आधारे एकत्रित नादेय प्रमाणपत्र तसेच ना चौकशी प्रमाणपत्र प्रमाणपत्र देणे . | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम,१९८२ चे नियम क्र ११९ , १२१ , १२५ | १. संबधीत मुख्याधिकारी / ज्या नगरपरिषदेत यापूर्वी सदर कर्मचारी कार्यरत होता अश्या नगरपरिषदेचा मुख्याधिकारी<br>२. संबधीत जिल्हा प्रशासन अधिकारी एकत्रित नादेय प्रमाणपत्र तसेच ना चौकशी प्रमाणपत्र देईल. |

आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन

| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
|---|---|---|---|
| २२ | नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होणारे कर्मचारी यांना सेवा निवृती आदेश देणे / सक्षम प्राधिकारी यांचे कडून पर्यायी नेमणूक झालेली नसल्यास त्यांचे कडील कार्यभार इतर कर्मचारी यांचे कडेस सोपविणे, | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम,१९८२ चे नियम क्र १३५ | संबंधित नगर परिषद/नगर पंचायत मुख्याधिकारी हे निवृत्ती आदेश देतील. नगरपरिषदेत संबंधित संवर्गाचा इतर कर्मचारी उपलब्ध असल्यास मुख्याधिकारी त्यांच्याकडेस सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याचा अतिरिक्त कार्यभार सोपवतील. संबंधित संवर्गातील इतर कर्मचारी उपलब्ध नसल्यास मुख्याधिकारी सेवा निवृत्ती दिनांकाच्या किमान १० दिवस अगोदर जिल्हा प्रशासन अधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करतील व जिल्हा प्रशासन अधिकारी जिल्ह्यातील इतर नगरपरिषदेतील संबंधित कर्मचाऱ्याकडे कार्यभार सोपविण्याचे आदेश देतील. |
| २३ | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या किंवा ज्यांना सक्षम प्राधिकारी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्त / रुग्णता सेवा निवृतीस होण्यास परवानगी दिलेली आहे किंवा सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचारी किंवा प्रकरण परत्वे त्यांचे वारसांना सेवा निवृती लाभ प्रदान करणेसाठी त्यांचे सेवा निवृतीवेतन / कुटुंब निवृतीवेतन , उपदान , भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान करणे इ. लाभ मंजूर करण्यासाठी महालेखाकार यांना सादर करणेसाठी प्रस्ताव तयार करुन जिल्हा प्रशासन अधिकारी यांना सादर करणे. | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम,१९८२ चे नियम क्र १२१ ,१२२ ,१३२ १३९ | संबंधित नगर परिषद/नगर पंचायत मुख्याधिकारी. |

| आयुक्त तथा संचालक , नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगरपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
| २४ | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या किंवा ज्यांना सक्षम प्राधिकारी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्त / रुग्णता सेवा निवृतीस होण्यास परवानगी दिलेली आहे किंवा सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचारी किंवा प्रकरण परत्वे त्यांचे वारसांना सेवा निवृती लाभ प्रदान करणेसाठी त्यांचे सेवा निवृतीवेतन / कुटुंब निवृतीवेतन , उपदान , सेवा निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण इ. लाभ मंजूर करण्यासाठी महालेखाकार यांना सादर करणेसाठी संबधीत मुख्याधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव तपासून तो मान्यतेसाठी महालेखाकार यांचेकडेस सादर करणे; | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम,१९८२ चे नियम क्र १२३ , १२४ , १२५ , १३६ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंश राशीकरण) नियम,१९८४ चे नियम क्र १४ , २० | संबंधीत जिल्हा प्रशासन अधिकारी. |
| २५ | महालेखाकार यांच्या कडील प्राधीकृती ( मंजूरी )नुसार सेवा निवृती कर्माचारी यांना किंवा मयत कर्मचारी यांचे वारसास उपदान/ मृत्यू उपदान / सेवा निवृत्ती वेतनाचे अंशाराशीकरण इत्यादीसह लागू असलेले सेवा निवृती विषयक लाभ अदा करण्यासाठी आदेश पारित करणे व कोषागार देयक सादर करून देय रकमा अदा करणे. | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम,१९८२ चे नियम क्र १२७ ,१३१ , १३३,१३४ ,१४२ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंश राशीकरण) नियम,१९८४ चे नियम क्र १५ , ३० | संबंधीत जिल्हा प्रशासन अधिकारी. |
| २६ | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या किंवा ज्यांना सक्षम प्राधिकारी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्त / रुग्णता सेवा निवृतीस होण्यास परवानगी दिलेली आहे किंवा सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचारी किंवा प्रकरण परत्वे त्यांचे वारसांना भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान करणेसाठी लेखा अधिकारी (महालेखाकार) यांचे कडेस सादर करणेसाठी प्रस्ताव तयार करणे. | महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम , १९९८ चे नियम २६ , २७ | मुख्याधिकारी , संबधीत नगरपरिषद / नगरपंचायत |

| आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
| २७ | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या किंवा ज्यांना सक्षम प्राधिकारी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्त / रुग्णता सेवा निवृतीस होण्यास परवानगी दिलेली आहे किंवा सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचारी किंवा प्रकरण परत्वे त्यांचे वारसांना भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान करणेसाठी लेखा अधिकारी (महालेखाकार) यांचे कडेस प्रस्ताव सादर करणे , लेखाधिकारी यांनी प्रदान प्राधिकृत केल्यानंतर | महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम , १९९८ चे नियम २६ , २७ , २८ , २९ | जिल्हा प्रशासन अधिकारी . संबंधित जिल्हा |
| २८ | भविष्य निर्वाह निधीमधून रक्कम काढण्यास किंवा परतावा योग्य अग्रिम काढण्यास /निवृत्ती पूर्वी ९० % पर्यंत रक्कम काढणे यास मंजुरी देणे | महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम , १९९८ चे नियम क्र. १६ ,१७ , १८ | जिल्हा प्रशासन अधिकारी . संबंधित जिल्हा |
| २९ | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या किंवा ज्यांना सक्षम प्राधिकारी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्त / रुग्णता सेवा निवृतीस होण्यास परवानगी दिलेली आहे किंवा सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचारी यांचे खाती शिल्लक रजेचा अंतिम हिशोब पूर्ण करून प्रमाणित करणे व महालेखाकार यांचे कडून निवृत्ती वेतनाचा प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यांनतर नियमानुसार शिल्लक रजेच्या रोखीकरणासाठी देयक तयार करून ते जिल्हा प्रशासन अधिकारी यांचे कडेस सादर करणे. | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ६८ / ६९ | मुख्याधिकारी , संबधीत नगरपरिषद / नगरपंचायत |

आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन

| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
|---|---|---|---|
| ३० | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या किंवा ज्यांना सक्षम प्राधिकारी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्त / रुग्णता सेवा निवृतीस होण्यास परवानगी दिलेली आहे किंवा सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचारी यांचे खाती शिल्लक रजेचा रोखीकरणासाठी प्रस्तावास मान्यता देणे , कोषागारात देयक सादर करणे व अदा करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ नियम ६८ / ६९ | जिल्हा प्रशासन अधिकारी . संबंधित जिल्हा |
| ३१ | नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या किंवा सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय किंवा न्यायिक कार्यवाही प्रलंबित असेल त्याबाबतीत तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम,१९८२ चे नियम क्र १३० | जिल्हा प्रशासन अधिकारी . संबंधित जिल्हा |
| ३२ | कर्मचारी गट विमा योजनेंतर्गत विविध प्रकाराची प्रदाने करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (गट विमा ) नियम,१९८४ व महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम,१९८१ चे नियम क्र ३३ | जिल्हा प्रशासन अधिकारी . संबंधित जिल्हा |
| | (अ) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-याबाबत किमान सेवा निवृत्ती दिनांकाच्या सहा महिने आधी पासून नादेय प्रमाणपत्र तसेच ना चौकशी प्रमाणपत्र मागविणे साठी कार्यवाही सुरु करणेत यावी .( ब ). संबधीत नगरपरिषदा कडून नादेय प्रमाणपत्र तसेच ना चौकशी प्रमाणपत्र मागविताना संबधीत जिल्हा प्रशासन अधिकारी यांनाही प्रत देण्यात यावी. जिप्रअ यांनी मासिक आढावा बैठक घेतांना अशा प्रकरणांचा आढावा घ्यावा. ( क ). ज्या नगरपरिषदेत यापूर्वी सदर कर्मचारी कार्यरत होता अश्या नगरपरिषदेने मागणी झाल्यापासून दहा दिवसात प्रमाणपत्र प्रकरण परत्वे येणे रकमा किंवा चौकशीचा तपशील संबधीत मुख्याधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे . | | |
| | (ब) मुख्याधिकारी यांनी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-याबाबत सेवानिवृती लाभ देणेसाठी प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही किमान सहा महिने आधी पासून सुरु करणेत यावी व सेवा निवृत्तीच्या दिनांकापूर्वी प्रस्ताव जिल्हा प्रशासन अधिकारी यांचे कडेस सादर करणेत यावा. | | |

| आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
| | (क) जिल्हा प्रशासन अधिकारी . संबंधित जिल्हा यांनी प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून कमाल दोन आठवड्याच्या कालावधीत तपासून व आवश्यक पूर्तता करून महालेखाकार यांचे कडेस सादर करणेत यावा. | | |
| | (ड) नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होणारे कर्मचारी यांना मुख्याधिकारी यांनी शक्यतोवर सेवानिवृत्तीच्या दिनांकाच्या एक आठवड्यापूर्वी सेवा निवृती आदेश तसेच त्यांचे कडील कार्यभार इतर पर्यायी कर्मचारी यांचे कडेस सोपविणे, आदेश निर्गमित करावे. | | |
| ३३ | भविष्य निर्वाह निधी , कर्मचारी गट विमा योजना आणि इतर निधी किंवा योजना याची शासनाने विहित केल्या प्रमाणे वर्गणी वसूल करून भरणा करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम,१९८१ चे नियम क्र ३३ | मुख्याधिकारी , संबधीत नगरपरिषद / नगरपंचायत |
| ३४ | नविन नियुक्त संवर्ग कर्मचाऱ्यांची अंशदायी निवृत्ती योजना (DCPS) व राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) यासाठी नोंदणी करुन त्यांना DCPS व PRAN क्रमांक प्रदान करणे. | राष्टीय अंशदायी निवृत्ती वेतन योजना बाबत शासन निर्णय वित्त विभाग दि. ०६.०४.२०१५. | जिल्हा प्रशासन अधिकारी . संबंधित जिल्हा |
| ३५ | दि. ३० जानेवारी २०१८ पूर्वी सरळसेवेव्दारे नियुक्त करण्यात आलेले विविध सेवा संवर्गातील कर्मचारी यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम,१९८१ चे नियम क्र ९ (४३) | ज्या प्राधिकारी यांनी त्यांना प्रथम नेमणूक दिली ते संबधित जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त ; व ज्या कर्मचारी यांची संबधित जिल्हा किंवा विभागातून बदली झालेली असल्यास ज्या जिल्ह्यात बदली करण्यात आलेली आहे, त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी |

| आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
| ३६ | अराजपत्रित कर्मचा-याचे सेवाभिलेख सुस्थितीत ठेवणे ( नवीन नियुक्त कर्मचा-याचे सेवा पुस्तक ठेवणे ) | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम,१९८१ चे नियम क्र ३६ , | प्रथम नेमणूकी च्या नंतर ज्या जिल्ह्यात संबधित कर्मचा-यास नेमणूक देण्यात आलेली आहे त्या संबधित जिल्हा प्रशासन अधिकारी हे नवीन सेवा पुस्तक उघडून त्यात नेमणूक , जन्मतारीख , शैक्षणिक अर्हता , वैद्यकीय तपासणी प्रारंभिक नोंदी कराव्यात , नियम ३८ नुसार पुढील कार्यवाहीसाठी मुळ सेवा पुस्तक संबधित नगरपरिषद मुख्याधिकारी यांचेकडे सोपवेल तसेच सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत संबधित कर्मचा-यास उपलब्ध करून देईल. |
| ३७ | सेवा पुस्तकात सर्व घटनांची नोंद घेणे | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम,१९८१ चे नियम क्र ३८ , ३९ ,४१ , ४२ , ४३ ,४५,४७ ,४८ | मुख्याधिकारी , संबधित नगरपरिषद / नगरपंचायत |
| ३८ | कायमतेचा लाभ ( स्थायित्व प्रमाणपत्र ) उपलब्ध करूनदेणे | शासन साप्रवी निर्णय क्र. स्थाप्राप-१४१४/प्र.क्र.७३/१४/१३-अ दि.११ सप्टेंबर २०१४ | जिल्हा प्रशासन अधिकारी . संबंधित जिल्हा |
| ३९ | संगणक हाताळणी / वापरा पासून सूट देणे | महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविणे बाबत) नियम १९९९ | जिल्हा प्रशासन अधिकारी . संबंधित जिल्हा |
| ४० | हिंदी / मराठी भाषा परीक्षेतून सुट देणे. | सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दि. ३०/१२/१९८७ व १०/०६/१९७६ | जिल्हा प्रशासन अधिकारी . संबंधित जिल्हा |

| आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
| ४१ | मत्ता व दायित्व विवरण पत्रे स्वीकारणे व सुरक्षित ठेवणे. | शासनाच्या वेळोवेळी शासन निर्णय/आदेश याव्दारे देण्यात येणाऱ्या सुचना/आदेश सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. ०२.०६.२०१४ | संबंधित नगरपरिषद/नगरपंचायती मधील मुख्याधिकारी यांनी कार्यरत सर्व संवर्ग कर्मचारी यांचे दर वर्षाचे शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील मत्ता दायित्व विवरणपत्रांचे लखोटे विहित मुदतीत प्राप्त करून घ्यावेत<br>(टीप : मुख्याधिकारी यांनी प्राप्त मत्ता व दायित्व विवरण पत्र प्राप्त झालेबाबत प्रत्येक वर्षी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्या मध्ये जिल्हा प्रशासन अधिकारी याना अहवाल सादर करावा , या प्रमाणे प्राप्त अहवाल जि प्र अ यांनी अभिलेखासाठी संकलित करावेत , आवश्यकतेनुसार माहिती संचालनालयास उपलब्ध करून द्यावी.) |
| ४२ | गोपनीय अहवाल प्रतिवेदन पुनर्विलोकन, संस्करण आणि जतन करणे | सामान्य प्रशासन विभागाचे परीपत्रक दि. १२/०३/२००४ व दि ०१/०२/१९९६ | १)मुख्याधिकारी, संबंधित नगरपरिषद / नगरपंचायत हे सर्व कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवाल लिहतील व त्यांचे पुनर्विलोकन संबंधित जिल्ह्याचे जिल्हा प्रशासन अधिकारी हे करतील.<br>२)संबंधित जिल्ह्याचे जिल्हा प्रशासन अधिकारी हे गोपनीय अहवाल , संस्करण आणि जतन करतील. |
| ४३ | नियमानुसार अनुज्ञेय असेल त्या पेक्षा अधिक पण तीस दिवसांच्या विहित कमाल मर्यादे मध्ये पदग्रहण अवधी मंजूर करण्याचा अधिकार | महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, परकीय सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने) नियम, १९८१ नियम २७ | बदली संबधी आदेश देणारा प्राधिकारी |
| ४४ | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम , १९७९ नुसार शिक्षा करणे | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम , १९७९ नियम १० नुसार किरकोळ शिक्षा करणे | ज्या नगरपरिषदेत घटना घडली त्या जिल्हयाचे जिल्हा प्रशासन अधिकारी |

| आयुक्त तथा संचालक , नगारपरिषद प्रशासन संचालनालय यांना महाराष्ट्र नगारपरिषद सेवा अंतर्गत विविध श्रेणी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून असलेल्या अधिकारांचे पुन:प्रत्यायोजन | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | अधिकारांचे स्वरूप विषय | संबधित नियम / शासन निर्णयाची तरतूद | आयुक्त तथा संचालक यांनी त्यांचे कडील अधिकारांचे प्रत्यायोजीत करणेत येत असलेले प्राधिकारी |
| ४५ | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम , १९७९ नियम १० नुसार करण्यात आलेल्या शिक्षा विरुध्द अपिलावर निर्णय घेणे | वरीलप्रमाणे | संबंधित प्रादेशिक उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन |
| ४६ | शासन आदेशानुसार अश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणे | शासन निर्णय वित्त विभाग दिनांक २०.०७.२००१. व डी.१.०४.२०१० | या बाबत प्रत्येक जिल्हा स्तरावर खालील प्रमाणे समिती असेल:- १) संबंधित जिल्हा प्रशासन अधिकारी - अध्यक्ष २) संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत - सदस्य सचिव ३) संबंधित नगरपरिषदेचा लेखापाल. ४) संबंधित जिल्हाधिकारी नियुक्ती करेल असा वर्ग-२ चा मागासवर्गीय अधिकारी. समितीच्या निर्णयाप्रमाणे मुख्याधिकारी आदेश निर्गमित करतील. |

(मुथ्थुकृष्णन संकरनारायणन्)

आयुक्त तथा संचालक

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.**